**रे.मु.नं. ०५/२०१४.**

सिताराम कारभारी
वि.
कारभारी सटवा ,वगैरे.

**नि.२५ वरील आदेश**

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की,वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरूध्द वाटपासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदरचे दाव्यात प्रतिवादी नंबर ७ नामे मिराबाई हरीभाउ कुदनर ही प्रतिवादी नं. ३ ची पत्नी आहे. परंतू सदरचा दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी नंबर. ७ हिचे नांव संगणीकृत करताना नजरचुकीने प्रतिवादी नं. ७ हिचे नांव '**मिराबाई हरीभाउ कुदनर**' ऐवजी ''**मिराबाई शिवराम खेमनर**'' असे टाईप झालेले आहे. सदरची चुक नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे झालेली आहे. सदरची दुरूस्ती करणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे व आवश्यक आहे. सदरची दुरूस्ती केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र सदरची दुरूस्ती न केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. सदरच्या दुरूस्तीने दाव्यात कोणत्याही स्वरूपात बदल होणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी नंबर ३,४,८ व ९ यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देवून अर्जास आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीला प्रतिवादीच्या नावाची व दाव्याची पुर्ण माहिती आहे. केवळ त्रास देण्यासाठी व दावा विनाकारण लांबणीवर टाकण्यासाठी सदरचा दुरूस्ती अर्ज दिलेला आहे. यदाकदाचीत अर्ज मंजूर केल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी.

४. दोन्ही वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली. सदरचा दावा दिनांक ३०.१२.२०१३ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदरची चुक ही नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीने झाल्याचे दिसुन येत आहे. तसेच सदरची दुरूस्ती तांत्रीक स्वरूपाची आहे.

५. वर चर्चा केलेल्या कारणास्तव अर्जात नमूद दुरूती करणे आवश्यक व गरजेचे आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काही एक नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी यांना दुरूस्त कैफियत देण्याची मुभा आहे. त्यामुळे पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी व इतर दाव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित करणे ठरणार आहे. म्हणून खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ वादी यांनी खर्च म्हणून रक्कम रूपये २५०/- (रक्कम रूपये दोनशे पन्नास मात्र) प्रतिवादी यांना देण्याचे आहे.

३ वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती कायद्यातील तरतुदीप्रमाणे करून घेण्याचे आहे.

(सं . क. कारंडे )
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
संगमनेर.

दिनांक :- २७.०३.२०१७